किमान आधारभूत किमतीने सोयाबीन, मूग आणि उडीद खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु - पणन मंत्री रावल >>पान 2

केंद्र सरकारप्रमाणे महाराष्ट्राचे 'स्टेट मन्युफॅक्चरिंग मिशन' सुरु करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

क्षणभरात विझला डोणगावच्या उजेड शिवमचा अपघातात मृत्यू >>पान 4

**सुविचार**

प्रत्येक दिवशी नवीन संधी आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 87 ■ गुरूवार, दि. 30 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सलमानची फेवरेट सिंगर, स्मृती मानधनासोबत कसे आहे नाते? आतील पान

# राज्याच्या सागरी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी अबूधाबी पोर्ट्स ग्रुपसोबत दोन अब्ज डॉलर्सचा सामंजस्य करार

## राज्याच्या सागरी उद्योग क्षेत्राची नवी भरारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच, राज्य शासन, अबूधाबी पोर्ट्स ग्रुप आणि अबू धाबीचे 'इन्व्हेस्टमेंट सिर्सोस अँड प्रेसिडेन्शियल ऑफिस' यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सागरी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले असून, यामध्ये भारताच्या बंदरे मंत्रालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.**



वर्षा निवासस्थानी झालेल्या या सामंजस्य करार प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, तसेच अबूधाबी पोर्ट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अहमद अल मुतावा, इक्विलाईन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी सलाह अल नासेर आणि रुरल एनहॅन्सर्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंबर आयदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या करारानुसार जहाजबांधणी, जहाजविघटन, जलवाहतूक, बंदर पायाभूत सुविधा आणि क्रूझ व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये तब्बल दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत गुंतवणुकीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र देशातील एक अग्रगण्य सागरी केंद्र म्हणून अधिक बळकट होणार आहे.

अबूधाबी पोर्ट्सने देशात प्रथमच फक्त महाराष्ट्र शासनासोबत केलेला हा पहिलाच करार आहे. यामुळे जागतिक स्तरावर राज्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या भागीदारीचा उद्देश तांत्रिक सहकार्य, बंदरांचे आधुनिकीकरण, लॉजिस्टिक विकास आणि सागरी रोजगारनिर्मिती यांना चालना देणे हा आहे.

हा करार राज्याच्या ब्लू इकॉनॉमी आधारित विकास २०३० या दीर्घकालीन दृष्टीकोनाशी सुसंगत आहे, ज्यामुळे सागरी क्षेत्रात शाश्वत विकास आणि जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# दर्जाहीन कृत्रिम वाळूवर टाच! एम-सँड धोरणात मोठी सुधारणा

अंमलबजावणीचे अधिकार शासनाकडून जिल्हाधिकाऱ्यांना; निर्णय जारी



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (एम सँड) वापर वाढवा तसेच दर्जाहीन कृत्रिम वाळूवर थेट कारवाई व्हावी यासाठी मूळ धोरणात सुधारणा करण्यात आली असून, एम सँड युनिटला मान्यता तसेच यापद्धतीच्या युनिटला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय मर्यादा ५० वरून १०० युनिटपर्यंत नेण्याचा मंत्रालयपातळीवरील हक्क जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एम सँड युनिटसाठी दिलेल्या अटींचे व गुणवत्तेचे उल्लंघन केल्यास प्रथम परवाना निलंबित करून, नंतर कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारणेचा शासन निर्णय जारी करत, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अंमलबजावणीबाबतचे दिशानिर्देश देणारे पत्र दिले आहे.

नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळू वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या राज्य सरकारच्या धोरणात करण्यात आलेली सुधारणा सांगून मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यातील स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासोबतच एम-सँडच्या गुणवत्तेवर भर देणारे महत्त्वाचे बदल केले आहेत. तसेच याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना धोरण अंमलबजावणीचेही अधिकार देण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात एम-सँड युनिट स्थापन करणाऱ्या पहिल्या ५० उद्योजकांना किंवा संस्थांना शासकीय सवलती लागू राहतील, मात्र भौगोलिक परिस्थिती आणि अर्जांची संख्या पाहून, जिल्हाधिकाऱ्यांना ही मर्यादा शंभर युनिट्सपर्यंत वाढवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

शासकीय जमिनीचा एम-सँड युनिटसाठी लिलाव करताना, त्यात केवळ महाराष्ट्रात नोंदणीकृत संस्थांनाच भाग घेता येईल. नवीन उद्योजकांना संधी मिळावी, यासाठी ज्यांच्या नावे आधीच खाणपट्टा मंजूर आहे, अशा व्यक्ती किंवा संस्थांना या लिलावात अपात्र ठरवण्यात येईल. या युनिट्ससाठी ५ ते १० एकरपर्यंत जागा मंजूर केली जाईल आणि जागा मंजूर झाल्यापासून एका वर्षाच्या आत युनिट कार्यान्वित करणे बंधनकारक असेल.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अत्यंत आदर

## लवकरच भारतासोबत मोठा व्यापार करार करणार डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

सियोल : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लवकरच भारतासोबत मोठा व्यापार करार करण्याची घोषणा बुधवारी केली. दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य (अझएउ) सीईओ समिट मध्ये बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतच्या आपल्या संबंधांचे कौतुक केले आणि त्यांच्याबद्दल आपल्याला 'अत्यंत आदर' असल्याचे स्पष्ट केले. अझएउ परिषदेत उपस्थित असलेल्या व्यावसायिक नेत्यांसमोर ट्रम्प म्हणाले, ''मी लवकरच भारतासोबत एक व्यापार करार करत आहे आणि मला पंतप्रधान



मोदींबद्दल खूप आदर आणि प्रेम आहे. आमचे संबंध खूप चांगले आहेत.''

पंतप्रधान मोदींविषयी बोलताना ट्रम्प यांनी मिश्किल टिप्पणीही केली. ते म्हणाले, ''पंतप्रधान मोदी खूप चांगले दिसणारे व्यक्ती आहेत. ते असे दिसतात की त्यांना तुमचा बाप बनायला आवडेल,'' असे म्हणून ट्रम्प थांबले नाहीत. पुढे ते म्हणाले, ''ते (मोदी) किलर आहेत, त्यांची सामग्री... नाही, आम्ही लढू.'' ट्रम्प यांच्या या वक्तव्याने परिषदेत हशा पिकला.

दक्षिण कोरियातील ग्योंगजू शहरात आयोजित या कार्यक्रमात ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील 'युद्ध' टाळल्याचा दावा केला. ''दोन अण्वस्त्रधारी शेजाऱ्यांवर (भारत आणि पाकिस्तान) व्यापारावरून दबाव टाकून मी त्यांच्यातील युद्ध टाळले,'' असे ट्रम्प यांनी यावेळी सांगितले. ट्रम्प बुधवारी दक्षिण कोरियात दाखल झाले आहेत. येथे सुरू असलेल्या एपीईसी परिषदेत ते चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक घेणार आहेत.

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी मुदत कालावधीत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी : आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरीता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी ची सुविधा १८ सप्टेंबर पासून दोन महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध करण्यात आली आहे. ई-केवायसी ची प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ असून आत्तापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी ची प्रकिया यशस्वी पूर्ण केली आहे . इतर लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी प्रक्रियेबाबत येणाऱ्या समस्यांवर उपाययोजनाबाबत आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण केले जात आहे. ही प्रक्रिया अतिशय सोपी व सुलभ असून, महिला स्वत:च्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया कमी वेळात पुर्ण करू शकतात. ज्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही त्यांनी १८ नोव्हेंबर पर्यंत ही प्रक्रिया पुर्ण करावी.

# रक्कम भरलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ सौर ऊर्जा पंप तात्काळ बसवून द्यावेत

## ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून सिंचनसुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून ज्या शेतकऱ्यांनी पैसे भरले आहेत, अशा शेतकऱ्यांना तत्काळ सौर पंप बसवून द्यावे, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले.

ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सौर ऊर्जा पंप योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत महावितरणचे अधिकारी तसेच राज्यभरातील सौर कृषी पंप पुरवठादार उपस्थित होते.

कुसुम 'बी' योजनेअंतर्गतची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, पुढील एका महिन्यात ३५ हजार सौर पंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पैसे भरूनही ज्यांचे सोलर पंप बसविले गेले नाहीत, ते तात्काळ बसविण्यात यावेत, असे निर्देश राज्यमंत्री बोर्डीकर यांनी दिले.

शेतकऱ्यांच्या सौर पंपसंबंधी तक्रारी 'महावितरण' चे पोर्टल, पुरवठादार पोर्टल तसेच कॉल सेंटरद्वारे प्राप्त होत असून त्यांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. याशिवाय, 'सूर्यघर' योजनेची माहिती लोकांपर्यंत पोहोचावी आणि त्याचा अधिकाधिक लाभ शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचेही निर्देशही ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले.

सौर कृषी पंपसंदर्भात दोन निविदा प्रक्रिया सुरू असून तिसरी निविदा लवकरच सुरू होईल. त्यानंतर चौथ्या टप्प्यातील निविदा प्रक्रिया हाती घेतली जाईल. प्रत्येक निविदेची मर्यादा एक लाख पंप असून, सहा महिने पैसे भरून सुद्धा सौर पंप न मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असली तरी या शेतकऱ्यांना लवकरच सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यात येईल असे महावितरण तर्फे यावेळी सांगण्यात आले.

रब्बी पिकामध्ये शेतकऱ्यांना पाण्याच्या अभावामुळे अडचण येऊ नये, यासाठी सर्व





उपाययोजना करण्याचेही निर्देशही देण्यात आले.

# महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य सामन्यासाठी पुण्याहून ३०० विद्यार्थी निघणार मुंबईला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या नेरूळ येथील डी. वाय. पाटील स्टेडियम येथे गुरुवार दि. ३० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यासाठी पुण्याहून ३ शाळांमधील सुमारे ३०० विद्यार्थी गुरुवार दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता मुंबईकडे निघत आहेत. पुण्यातील एड्स बाधित मुलांचे संगोपन व शिक्षण करणारी मानव्य संस्था (४५ विद्यार्थी) तुळापुर वळूज येथील ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी ईश्वरपूरम संस्था (४५ विद्यार्थी) आणि निंबाळकर गुर्जरवाडी येथील सुमती बालवन शाळा (१५० विद्यार्थी) शिक्षक व स्वयंसेवकांसह गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी या तीन शाळांमधून सकाळी ६ वाजता वातानुकुलीत बसेस मधून मुंबईकडे प्रयाण करणार आहेत. एक्झिम इंटिग्रेटेड क्लब (एघ्ण ट्रस्ट) यांचा सहयोग यासाठी लाभला आहे अशी माहिती या संकल्पनेचे जनक व बँकिंग तज्ज्ञ शशांक वाघ आणि एघ्ण ट्रस्टचे खजिनदार व या प्रकल्पाचे प्रमुख प्रदीप चव्हाण यांनी दिली.

# सहकार मंत्र्यांनी एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिले

दैनिक आपला विदर्भ

**चाकूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे.यात आपला ही खारीचा वाटा या उदात्त हेतूने राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी त्यांचे मंत्री म्हणून असलेले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी कपात करावे असे पत्र मंत्री ना. पाटील यांनी राज्याच्या अप्पर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभागास दिले आहे. सर्वसामान्यांचे झालेले हे नुकसान अतिशय वेदनादायी होते. राज्य सरकारने शक्य तितक्या तातडीने नुकसानग्रस्तांना मदतीचा हातही दिला होता. मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे शेतकरी बांधवांच्या दुःखाची मला पूर्णपणे जाणीव आहे आणि म्हणूनच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बांधवांसाठी मदतीचा हात म्हणून माझे ऑक्टोबर महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचा निर्णय सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी घेतला आहे.

# ओंकार हत्तीचा शाही प्रवास: सह्याद्रीच्या सरमळे, भालावल दिशेने 'ऐटीत' कूच!

**सावंतवाडी/प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी परिसरात सध्या एकाच नावाची चर्चा आहे, ती म्हणजे 'ओंकार हत्ती'. हा देखणा हत्ती आपला शाही प्रवास करत आता सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या सरमळे आणि भालावल परिसरात दाखल झाला आहे. त्याची ही 'ऐटीत' चाल बघून वन विभागानेही त्याचा थाट राखला आहे, जणू काही हा राजेशाही पाहुणा आहे! गेल्या महिनाभरात ओंकारने सावंतवाडी तालुका पालथा घातला आहे. कास, मडुरा, रोणापाल, इन्सुली, वाफोली, ओटवणे या गावांत तो हजेरी लावून गेला. या प्रवासात त्याने मुंबई-गोवा महामार्गावर इन्सुली येथे दोन वेळा 'दर्शन' दिले, तर तेरेखोल नदी तब्बल चार वेळा पार करून आपल्या पोहण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन केले. नदी-नाले पार करताना तो मस्तपैकी अंघोळही उरकून घेतो, असे त्याचे नित्यक्रम आहेत. सुरवातीला, दोडामार्ग तालुक्यातील मोर्ले येथे या हत्तीने एका शेतकऱ्याला चिरडून ठार केले होते. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण होते. मात्र, आता ओंकारचे वागणे खूपच 'शांत' आणि 'माणसाळल्यासारखे' झाले आहे. तो सध्या शांतपणे पुढे सरकत असल्याने, त्याला पाहण्यासाठी स्थानिक लोकांची आणि विशेषत: लहानथोरांची गर्दी वाढत आहे. वन विभागाने मात्र त्याची सुरक्षा आणि लोकांची काळजी घेत, त्याला वाट दाखवण्याचे काम हाती घेतले आहे.

>>पान २

## डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# किमान आधारभूत किमतीने सोयाबीन, मूग आणि उडीद खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु - पणन मंत्री रावल

### – ऑनलाइन ॲपद्वारे व खरेदी केंद्रावर नोंदणी– राज्यस्तरीय तीन नोडल संस्थांची नियुक्ती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :**सोयाबीन, मूग आणि उडीद या शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ केली आहे. या खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया ३० ऑक्टोबरपासून सुरू होत असून कापूस खरेदीसाठी 'कपास किसान' ॲपद्वारे नोंदणी १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू आहे. शेतकऱ्यांनी ॲपद्वारे अथवा खरेदी केंद्रावर नोंदणी करावी. एमएसपीनुसार पूर्ण रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल ," असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

या वर्षी मूग खरेदीचे ३.३० लाख क्विंटल, उडीद खरेदीचे ३२.५६ लाख क्विंटल आणि सोयाबीन खरेदीचे १८.५० लाख मेट्रिक टन असे मोठ्या प्रमाणात उद्दिष्ट आहे. शेतकरी विक्रीस आणेल त्या सर्व सोयाबीन, मूग आणि उडीद या शेतमालाच्या मोठ्या प्रमाणात खरेदीचे नियोजन राज्य शासनाने केले असल्याचे पणनमंत्री रावल यांनी सांगितले.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल बोलत होते. यावेळी प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, "केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्राधान्यकृत बाबींनुसार गेल्या दहा वर्षांत किमान आधारभूत किंमतीत मोठी वाढ करण्यात आली आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्राने ११.२१ लाख मेट्रिक टन सोयाबीनची विक्रमी खरेदी केली होती. यावर्षी केंद्र शासनाने सोयाबीनच्या एमएसपी मध्ये ₹४३६ प्रती क्विंटल वाढ करुन रु.५,३२८ केली आहे. तसेच उडीद एमएसपी रु.७,८०० आणि मूगसाठी ८७६८ रुपये केली आहे".

खरेदी प्रक्रिया पारदर्शकतेसाठी प्रभावी उपाययोजना

पणन मंत्री रावल यांनी सांगितले की, राज्यातील सर्व शेतकरी उत्पादक संस्था यांनी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) अंतर्गत शेतमालाची



ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शक खरेदी प्रक्रिया राबवावी, असे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहेत.

खरेदी नोंदणी प्रक्रिया ३० ऑक्टोबरपासून सुरू होणार असून, शेतकऱ्यांनी केंद्रावर अथवा ॲपद्वारे नोंदणी करून आपल्या सोयीनुसार तारीख आणि वेळ निश्चित करून शेतमाल खरेदी केंद्रांवर आणावा. केंद्र सरकारच्या मानकानुसार खरेदी प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हा आणि तालुकास्तरावर तक्रार निवारण कक्ष तसेच तक्रार नोंदवण्याकरिता संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय, खरेदी प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, कृषी अधिकारी आणि पोलिस प्रशासन यांच्या दक्षता पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबई, विदर्भ सहकारी पणन महासंघ, नागपूर आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे या तीन राज्यस्तरीय नोडल संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती यांना देखील पहिल्यांदाच खरेदी केंद्र म्हणून नियुक्त केले आहे. कापूस खरेदी हमीभाव योजनेअंतर्गत

राज्यातील प्रमुख नगदी पीक असलेल्या कापसासाठी देखील एमएसपी खरेदी सुरू आहे. 'कपास किसान' ॲपद्वारे नोंदणी १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू असून, आतापर्यंत ३.७५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे, अशी माहिती पणन मंत्री रावल यांनी दिली. मागील वर्षीचा कापूस दर ₹७५२१ होता, यावर्षी केंद्र शासनाने यात मोठी वाढ करून ₹८११० प्रती क्विंटल दर निश्चित केला आहे. म्हणजेच ₹५८९ रुपयांची वाढ केली आहे. गेल्या वर्षी सहा लाख सत्तावीस हजार शेतकरी बांधवांकडून १०,७१४ कोटी रुपयांच्या १४४ लाख क्विंटल कापसाची विक्रमी खरेदी करण्यात आली होती. यामुळे यावर्षी खरेदी केंद्रांची संख्या १२४ वरून १७० पर्यंत वाढवण्यात आली आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' आणि 'भारत पर्व २०२५'

## राष्ट्रीय एकात्मता वाढवून विविधतेत एकतेचे दर्शन घडविणारा सोहळा

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. भारताची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून या दिवसाकडे पाहिले जाते. यानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे ३० ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले असून 'राष्ट्रीय एकता दिवस' आणि 'भारत पर्व २०२५' हे या कार्यक्रमाचा भाग आहे.

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलिनीकरण करून देशाची भौगोलिक आणि राजकीय एकता साध्य केली. कणखर निर्णयक्षमता, मुत्सद्देगिरी, नैतिक धैर्य आणि देशप्रेम, राष्ट्रीय एक्य ही त्यांची गुणात्मक वैशिष्ट्ये होती. त्यांच्या धैर्यवान नेतृत्वाने आणि मुत्सद्दी दृष्टिकोनाने भारताच्या अखंडतेचा पाया रचला. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुजरातमध्ये उभारलेला १८२ मीटर उंच 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' आज जगातील सर्वाधिक उंच पुतळा असून, २०२४-२५ या वर्षात तब्बल ६०.५९ लाख पर्यटकांनी येथे भेट दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय उत्सवप्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचा उद्देश देशातील युवक, स्वयंसेवक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये राष्ट्रनिर्माणाची भावना जागृत करणे हा आहे. जनभागीदारीद्वारे राष्ट्रनिर्माण करण्यासाठी या उपक्रमाद्वारे युवक, स्वयंसेवक, नागरिक आणि समाजातील सर्व घटकांना राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री यांच्या प्रोत्साहनातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

लोहपुरूष सरदार पटेल यांच्या कार्याची ओळख युवकांपर्यंत पोहोचावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत राष्ट्रीय पदयात्रेचा शुभारंभ २६ नोव्हेंबर रोजी करमसाड, अहमदाबाद (सरदार पटेल यांचे जन्मस्थान) येथून सुरू होऊन स्टॅच्यू ऑफ युनिटी, केवडिया येथे संपन्न होणार आहे. या प्रवासात युवक, माय भारत स्वयंसेवक, एनएसएस व यंग लीडर्स विविध सामाजिक विकास उपक्रमांमध्ये सहभागी होतील. या मार्गातील गावे, जिल्ह्यांच्या १५० ठिकाणी लोहपुरूष सरदार पटेल यांच्या जीवनावर आधारित प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सरदार गाथा सत्रांचे आयोजन करण्यात येईल. ज्यामध्ये सरदार पटेल यांच्या प्रेरणादायी कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी माय भारत पोर्टलवर https://mybharat.gov.in/pages/unity_march ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकारच्या https://mybharat.gov.in या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध असून, देशातील सर्व युवकांना या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी 'सरदार @150 एकता मोहिमे'त सहभागी होण्याचे आवाहन शासनामार्फत करण्यात आले आहे.

### भारत पर्व अंतर्गत राज्यात विविध उपक्रम

महाराष्ट्रात ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांना लोहपुरुषांच्या विचारांची प्रेरणा मिळून सामाजिक बांधिलकी अधिक बळकट होईल, या विचारातून क्रीडा मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी या कार्यक्रमात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग, माय भारत, एनएसएस, एनसीसी तसेच स्थानिक प्रशासन संयुक्तिकरित्या जिल्हास्तरीय पदयात्रा काढणार असून प्रत्येक जिल्ह्यात ८ ते १० कि.मी. अंतराच्या जिल्हास्तरीय पदयात्रा, निबंध आणि वादविवाद स्पर्धा, सरदार पटेल यांच्या जीवनावर चर्चासत्रे आणि पथनाट्ये, नशा मुक्ती भारत प्रतिज्ञा, योग आणि आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम, संस्था स्वदेशी मेळावे, आत्मनिर्भर भारत प्रतिज्ञा, सांस्कृतिक सादरीकरण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक राज्याद्वारे अशा अभिनव स्पर्धा आणि कार्यक्रमांतून देशभर सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

### स्वराज्य : एकतेचा धागा

गुजरात येथे राष्ट्रीय संचलनात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे यावर्षी स्वराज्य : एकतेचा धागा या संकल्पनेवर आधारित चित्ररथ साकारण्यात येणार आहे. या माध्यमातून राज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात येणार आहे. या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ७ आणि ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल. या सांस्कृतिक कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्साठी गोंधळ, नृत्य, कोळी नृत्य, लावणी तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले १५ ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे. या उपक्रमांद्वारे राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.


### गुजरातमध्ये भव्य भारत पर्व सोहळा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एकता दिनाचा मुख्य भव्य सोहळा गुजरातमधील एकता नगर (जिल्हा नर्मदा) येथे करण्यात येणार आहे. यावेळी भव्य संचलन आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. संचलनादरम्यान सीएपीएफ आणि विविध राज्यांच्या पोलिस तुकड्या त्यांच्या शौर्य, शिस्त आणि कौशल्याचे प्रदर्शन करतील. या संचलनात बीएसएफ, सीआरपीएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, तसेच महाराष्ट्र, पंजाब, केरळ, जम्मू-काश्मीर, आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, आसाम, त्रिपुरा आणि छत्तीसगड राज्यांच्या पोलीस तुकड्या सहभागी होतील. घोडदळ, उंटदळ, भारतीय श्वानांच्या प्रजाती, तसेच विविध मार्शल आर्ट्स आणि नि:शस्त्र लढाऊ कवायतींचे सादरीकरण होणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्याद्वारे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचा आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणार आहेत.

### 'भारत पर्व' मधून विविधतेत एकतेचे दर्शन

१ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत होणाऱ्या या भव्य सोहळ्यात विविध राज्यांतील सांस्कृतिक कार्यक्रम, हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शन आणि खाद्य महोत्सवाचा समावेश करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करून या महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. यावेळी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात, आपल्या संस्कृतीची समृद्ध विविधता आणि राष्ट्रीय एकतेला उजाळा देणारे ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करणार आहेत.

गुजरात येथे १८०० चौरस मीटर अशा भव्य परिसरात गुजरात शासनाच्या पर्यटन विभागामार्फत सिंगल डोम (जर्मन हँगर स्ट्रक्चर) उभारण्यात येणार आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाकडून प्रदर्शनासाठी राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांसाठी थीम पॅव्हेलियनसाठी स्वतंत्र जागा निश्चित



करण्यात येणार आहे. थीम पॅव्हेलियन्साठी हँगर स्ट्रक्चरची उभारणी करण्यात येणार असून प्रत्येक पॅव्हेलियनचे परिमाण पाच मीटर x पाच मीटर इतके असणार आहे.

विविध खाद्यपदार्थांचे ४५ तसेच हस्तकला वस्तू प्रदर्शनाचे ५५ असे १०० स्टॉल्स असणार आहेत. हस्तकला वस्तूंचे स्टॉल केंद्र शासनाच्या हस्ततंत्र व हस्तकला विकास आयुक्तालयामार्फत तर पाच स्टॉल हस्तकला आदिवासी विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत. १०.८ चौरस मीटर परिसरात हे स्टॉल असतील याचे व्यवस्थापन गुजरात सरकारच्या पर्यटन विभागामार्फत केले जाणार आहे.

४५ स्टॉल्स खाद्यपदार्थांसाठी असणार आहेत. यापैकी पाच दालने ही आदिवासी विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत.

तर ३० स्टॉल हे नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट वेंडर ऑफ इंडिया यांच्यामार्फत उभारण्यात येणार असून, उर्वरित पर्यटन विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत.

स्टुडिओ किचनची उभारणी आयएचएम गांधीनगरतर्फे भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या समन्वयाने १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात येईल. पर्यटन विभागामार्फत येथे येणाऱ्या वस्तू व खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी राहण्याची तात्पुरती सोय करण्यात आली आहे. पर्यटक आणि सहभागी युवकांना विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, खाद्य पदार्थांचे स्टॉल, विविध राज्यांची संस्कृती दर्शविणारे केंद्र उभारून विविधतेत एकतेचे दर्शन या सोहळ्याच्या माध्यमातून घडणार आहे.

### एक भारत, श्रेष्ठ भारताच्या संकल्पनेला नवा उत्साह

३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे एकावेळी दोन राज्ये अशा पद्धतीने भारत पर्व अंतर्गत एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे.

**श्रद्धा मेश्राम**
**विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# केंद्र सरकारप्रमाणे महाराष्ट्राचे 'स्टेट मन्युफॅक्चरिंग मिशन' सुरू करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लीडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' चे प्रकाशन
- 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट' स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी** : केंद्र सरकार राष्ट्रीय उत्पादन अभियान (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरू करत असताना त्याबरोबरीने महाराष्ट्र शासनही 'राज्य उत्पादन अभियान' सुरू करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिटयूट' स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी घोषित केले.

नीती आयोगाच्यावतीने यशदा येथे 'रिइमॅजनिंग मॅन्युफॅक्चरिंग : इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लिडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावर आयोजित 'द रोड टू इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नीती आयोगाच्या डिस्टिंग्विश्ड फेलो देबजानी घोष, सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी आदी उपस्थित होते.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासंदर्भातील रोडमॅप असलेला अत्यंत चांगला अहवाल पुण्यात प्रकाशित केल्याबद्दल नीती आयोगाला धन्यवाद देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात या क्षेत्रातील उन्नत तंत्रज्ञान पाहायला मिळते. उत्पादन क्षेत्राच्या



विकासासाठी नव्या विचाराने पुढे जावे लागेल. त्यासाठी फ्रंटियर टेक्नॉलॉजी आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे जागतिक स्पर्धेत स्थान पक्के करण्यासोबत नव्या क्रांतीला सामोरे जाणे गरजेचे आहे. आज 'एआय', क्वांटम कंम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्स या तीन स्तंभांनी प्रत्येक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रभावित केले आहे. त्याचा फायदा उठविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असेही ते म्हणाले.

प्रगत उत्पादन क्षेत्राचे नेतृत्व महाराष्ट्र करेल

मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले की, देशाला प्रगत उत्पादन (डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रात पुढे नेताना त्याचे नेतृत्व महाराष्ट्र करेल, त्यासाठी राज्याचे मॅन्युफॅक्चरिंग मिशन सुरू केले जाईल. राज्याने विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन तयार केले असून मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील परिवर्तन हादेखील त्याचा एक भाग आहे. डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगला चालना दिली जाणार असून त्यामुळे या क्षेत्रात मोठे परिवर्तन दिसेल. इतर देशांना भारताकडे आकर्षित करताना यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्या लागतील. असे केल्यास उत्तम तसेच कल्पक बुद्धिमत्ता असलेल्यांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. महाराष्ट्राने इज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत कृतीदल स्थापन केला असून त्याअंतर्गत १०० सुधारणा करणे निश्चित केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र हे देशाचे डेटा सेंटर कॅपिटल झाले आहे. पुणे मॅन्युफॅक्चरिंग, तंत्रज्ञान क्षेत्राचे शहर आहे. पुणे व मुंबईदरम्यान क्वांटम कॉरिडॉर तयार करण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे. नवी मुंबई डेटा सेंटर शहर असून पुणे-मुंबई दरम्यान इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

या शहरात ही जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिटयूट' उभारण्याचा प्रयत्न राहील. तसेच एज्युसिटी स्थापन करण्यात येत असून त्यात १२ सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यापीठे येणार असून त्यापैकी ७ विद्यापीठे आली आहेत. महाराष्ट्राला मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात अग्रेसर ठेवताना भारताला डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगचे ग्लोबल हब बनविण्यात येईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम म्हणाले, उत्पादन क्षेत्राला वगळून कोणताही देश विकसित होऊ शकत नाही. जगात या क्षेत्रात खूप बदल होत आहेत. हे होत असताना नव्या संधीदेखील निर्माण होतात. देशात राज्य घरगुती उत्पादनात (जीएसडीपी) महाराष्ट्र पुढे आहे. मात्र कायम पुढे राहण्यासाठी निरंतर काम करावे लागते. उत्पादन क्षेत्रात पुण्याचे महत्व मोठे आहे.

मागील अंदाजपत्रकात 'राष्ट्रीय उत्पादन अभियान' (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरू करण्याचे घोषित केले. त्या अनुषंगाने काम चालू असून लवकरच प्रत्यक्षात सुरू करण्यात येईल. इतर प्रगत देशांनी ज्याप्रमाणे उत्पादन क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले त्याचप्रमाणे आपल्या देशातही आणण्यावर यात भर देण्यात येणार आहे. जगात उत्पादन क्षेत्रात वेगाने बदल होत असून या क्षेत्रात आपल्या समोर नवी संधीदेखील येत आहे. महाराष्ट्र सकल राज्य उत्पादनात, उत्पादन, थेट परदेशी गुंतवणूक, रोजगार यामध्ये अग्रेसर आहे. म्हणून राज्याकडून मोठी अपेक्षा आहे. पुण्यात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी चांगली परिसंस्था (इको सिस्टीम) असून वाहनउद्योग, माहिती तंत्रज्ञान उद्योग आदी अनेक क्षेत्रात पुणे अग्रेसर आहे. राज्य शासनानेही राज्याच्या मॅन्युफॅक्चरिंग मिशनची सुरुवात करावी आणि त्यासाठी पुणे फ्रँटियार तंत्रज्ञानाचे केंद्र बनावे, असे आवाहन त्यांनी केले. फ्रँटियार टेक इंडस्ट्रीयल पार्क आणि कामगारांसाठी निवास संकुल उभारावेत, अशा अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या.

महिंद्रा समूहाच्या रुचा नानावटी यांनी राष्ट्रीय उत्पादन अभियानाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामाची माहिती दिली. उत्कृष्ट कृती दल स्थापन करून प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देणे, संशोधन व विकास क्षेत्रावर भर देण्यात येणार असून त्याचबरोबरीने भारताचे एआय मिशन आदी भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी असेल, असेही त्या म्हणाल्या.

सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी म्हणाले, भारतातील उद्योग क्षेत्रात संशोधन व विकासावर भर देण्याची आवश्यकता आहे. यात गुंतवणूक केल्यास उत्पादनात २० ते ३० टक्के वाढ होऊ शकते. उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने यासाठी सोबत काम करणे आवश्यक आहे, असे सांगून पुणे हे मोठी क्षमता असलेले उत्पादन हब आहे, असेही ते म्हणाले.

डेलॉईटचे ईश्वरन सुब्रमण्यन म्हणाले, विकसित भारतासाठी आपल्या जीडीपीची वाढ ६ टक्क्यावरून १२ टक्के आवश्यक आहे. जागतिक व्यापारात सध्याच्या २ टक्क्यावरून १० टक्क्यांवर आपला वाटा नेणे आवश्यक आहे. जर्मनी, दक्षिण कोरिया तसेच चीन देशातील जीडपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा २० टक्क्याहून अधिक वाटा आहे. या बाबी लक्षात घेऊन हा रोडमॅप तयार करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविकात श्रीमती घोष यांनी नीती आयोगाच्या माध्यमातून प्रगत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात सुरू असलेल्या नवीन उपक्रमांची माहिती दिली. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सध्याच्या उत्पादन क्षेत्राचे अद्ययावत उत्पादन उद्योगात रूपांतरण करण्यासाठी कल्पना सुचविण्यासाठी नीती फ्रंटियर टेक हब हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लीडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' चे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला निती आयोगाचे अधिकारी तसेच उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## ठाण्यात धक्कादायक घटना; १७ वर्षीय मुलगी संशयास्पद ८० टक्के भाजली; अल्पवयीन मित्रावर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी** : येथील बाळकूम गाव परिसरात १७ वर्षीय मुलगी (२४ ऑक्टोबर) घरात असताना अचानक पेटल्याची धक्कादायक घटना घडली. घटनेच्या वेळी तिचा अल्पवयीन मित्र घरात उपस्थित होता. घटनेनंतर त्यानेच मुलीला ठाणे सिव्हील रुग्णालयात दाखल केले. पण मुलगी सुमारे ८० टक्के भाजल्यानं तिला पुढील उपचारांसाठी मुंबईतील केईएम रुग्णालयात हलवण्यात आलं असून तिची प्रकृती गंभीर आहे.

दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची चर्चा : पीडित मुलीची आई कामावर गेली असताना ही घटना घडली. मुलगी आणि तिचा मित्र दोघंही एकाच परिसरात राहतात. दोघांमध्ये घनिष्ठ संबंध असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. घटनेच्या दिवशी मुलगा घरात असताना मुलगी पेटल्याची नोंद आहे. घटनास्थळी रॉकेलऐवजी पेट्रोलचा वापर झाल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, पीडित मुलगी ही पूर्वी कुटुंबासह मुंबईच्या चेंबूर परिसरातील लालडोंगर येथे राहत होते. त्यानंतर ते ठाण्याच्या बाळकूम परिसरात राहायला आले. तर त्याच परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मित्राचे मुलीच्या घरी येणे-जाणे होते. आईच्या तक्रारीवरून अल्पवयीन संशयिताला अटक : मुलीच्या आईने मुलीच्या मित्रावर संशय व्यक्त करत कापूरबावडी पोलिसांत तक्रार दिली आहे. संबंधित अल्पवयीन मुलावर हत्येचा प्रयत्न प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला ताब्यात घेऊन बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

पुढील तपास सुरू : या प्रकरणात ''मुलगी पेटली की तिला पेटवण्यात आलं?'' हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पीडितेने आत्महत्येचा प्रयत्न केला की हा पूर्वनियोजित कट होता, याचा तपास सध्या सुरू आहे. कापूरबावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण माने यांनी सांगितले की, ''पीडितेच्या आईच्या संशयावरुन गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.''

## परळीत होणार ''महापशुधन एक्स्पो २०२५''; ५.८४ कोटीचा निधी मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : ज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून परळीला देश पातळीवरील मोठा बहुमान मिळाला आहे. परळीच्या इतिहासात पहिल्यांदाच अनोखे व आगळे वेगळे असे देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन भरणार आहे. देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो हा परळीसाठी ऐतिहासिक बहुमान ठरणारा आहे.

राज्यातील पशुपालकांसाठी आणि कृषी क्षेत्राशी निगडित पशुसंवर्धन उद्योगांसाठी एक मोठी उपलब्धी म्हणून परळी वैजनाथ येथे १० ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान ''महापशुधन एक्स्पो २०२५'' हे देशपातळीवरील पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून होत असलेल्या या प्रदर्शनासाठी शासनाने ५ कोटी ८४ लाख रूपये मंजूर केले असून याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात



आला आहे. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे असून भारतात ११.६ टक्के पशुधन आहे. पशुपालन हा शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. महाराष्ट्रात पशुपालनातून शेतकऱ्यांना हमीपात्र उत्पन्न मिळत असून, ज्या भागात हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो, त्या भागात आत्महत्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले आहे. राज्याच्या विकासात विदर्भ व मराठवाडा या भागांचा सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाटा कमी असल्याने तेथील शेतकऱ्यांना व पशुपालकांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून परळीत अखिल भारतीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे अखिल भारतीय पशुप्रदर्शन पशुपालकांना नवीन तंत्रज्ञान, उत्पादन क्षमता व प्रजनन क्षमता वाढविण्यासाठी प्रेरणा देणार आहे.

या प्रदर्शनात राज्यातील आणि राज्याबाहेरील देशभरातून विविध जातींचे जातीवंत व उत्कृष्ट पशुधन प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ आणि विविध संस्थांचे स्टॉल्स लावले जाणार असून अद्ययावत तंत्रज्ञान, उपकरणे आणि नव्या संधींची माहिती पशुपालकांना मिळणार आहे. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी पशुसंवर्धन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. परळी वैजनाथ येथे होणारा हा ''महापशुधन एक्स्पो २०२५'' राज्यातील पशुपालक, उद्योग, संशोधक आणि सामान्य नागरिकांसाठी एक प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश

## कोल्हापूर-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील भुयारी मार्गांची कामे वेगाने पूर्ण करा-सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : कोल्हापूर व सातारा भागात लवकरच ऊस गाळप हंगाम सुरू होणार आहे. कारखान्यांना ऊस नेण्यासाठी कोल्हापूर सातारा राष्ट्रीय महामार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी या महामार्गावरील भुयारी मार्गांची व सेवा रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.

कोल्हापूर सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा आढावा व कराड येथील वाहतूक कोंडीसंदर्भात आज सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी या सूचना केल्या. यावेळी आमदार मनोज घोरपडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे, राष्ट्रीय महामार्गाचे प्रादेशिक अधिकारी अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम, उपसचिव सचिन चिवटे आदी उपस्थित होते. तसेच कोल्हापूर व सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, कोल्हापूर सातारा राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. भुयारी मार्ग व सेवा रस्त्यांच्या कामांमुळे या मार्गावर वाहतूक कोंडी होते. ही कोंडी टाळण्यासाठी कामांना वेग देण्याच्या सूचना कंत्राटदारांना द्याव्यात. तसेच ऊस गाळप हंगामात या महामार्गावरच ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी, ट्रॅक्टरची वाहतूक मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळेही वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मार्गावरील स्लिप रस्ते, कामे सुरू असलेल्या रस्त्यांवरील वळण मार्गावरील कामे पूर्ण करून तो रस्ता वाहतुकीस योग्य करावा. तसेच भुयारी मार्गाजवळील पर्यायी रस्ते सुस्थितीत करण्यात यावीत. जेणेकरून या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही.

वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस व जिल्हा प्रशासनाने नियोजन करावे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी क्रेनची व्यवस्था ठेवण्यात यावी. तसेच या ठिकाणी ट्रॅफिक वॉर्डन नेमण्यात येऊन त्यांची सेवा कोल्हापूर व सातारा पोलिसांच्या अखत्यारित देण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

भुयारी मार्गाची कामे जलदगतीने पूर्ण करण्यास कंत्राटदारांना सांगण्यात आले आहेत. तसेच ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते तेथे ट्रॅफिक वॉर्डन पुरविण्यात येतील. तसेच वळण रस्त्यांच्या ठिकाणचा रस्ता सुव्यवस्थित करण्यात येईल. कराडमधील रस्त्याचे काम दीड महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता श्रीवास्तव यांनी सांगितले.



## विविध वृत्त...

### अवलंबितांना विशेष सवलत,जीप रस्त्याकडे जाणाऱ्या मार्गावरील पथ दिवे बंद

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी** : जिला परिषद कन्या शाळेच्या पाण्याच्या टाकी पासून ते रेल्वे उड्डाणं ब्रिज पर्यंत ठीक ठिकाणी पालिकेने पथ दिवे उभारले आहेत. मात्र ते पथ दिवे काही ठिकाणी नादुरुस्त झाल्याने अंधाराचे सामराज्य पसरले आहे. तसेच जिल्हा परिषद ते पालिकेकडे जाणाऱ्या रस्त्यावर ही पथ दिवे बंद पडल्याने सर्वत्र अंधार होत आहे. याठिकाणी अंधाराचा फायदा घेत चोरट्याकडून डल्ला मारण्याची भीती व्यक्त होत आहे. वेळीच पालिकेने पथ दिवे बस विन्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. दरम्यान, सकाळी पहाटे फिरण्यासाठी अनेक जण याच रस्त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करतात यात महिला सह पुरुष ही सकाळी मॉर्निंग वॉल्क साठी बाहेर पडतात मात्र या रस्त्यावर बहुतांश ठिकाणी पथदिवे बंद पडल्याने अंधार होत आहे. त्यामुळे पालिकेने पथ दिवे बसविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### इतर मागास बहुजन कल्याण विभाग कार्यालयासाठी भाडेतत्वावर इमारतीबाबत आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या जिल्हा कार्यालयासाठी स्वतंत्र कार्यालयीन जागा भाडेतत्त्वावर घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी

इमारत भाड्याने देऊ इच्छिणाऱ्यांनी खाजगी इमारतींच्या मालकांनी १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक मुंबई शहर यांनी केले आहे.

ज्या खासगी इमारतींच्या मालकांकडे २५०० चौ.फ ुट (मुंबई शहर) आणि २५०० चौ.फुट (मुंबई उपनगर) इतकी स्वतंत्र क्षेत्रफळाची जागा उपलब्ध आहे आणि ती जागा शासनाच्या प्रचलित नियमांनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करेल त्या भाडेकरारावर देण्यास तयार आहेत, अशा मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील खासगी इमारतीच्या मालकांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मुंबई शहर, प्रशासकीय इमारत, भाग-१, चौथा मजला,आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ या कार्यालयाशी दि. १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

### महिला वैद्यकीय अधिकारी यांच्या आत्महत्ये प्रकरणी दोषींवर कारवाई करा, जिल्हा आरोग्य संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी** : फलटण उपजिहा रुग्णालय, जिल्हा सातारा येथे कार्यरत महिला वैद्यकीय अधिकारी डॉ संपदा मुंडे, यांच्या आत्महत्ये प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करणे व पीडितेला उचित न्याय मिळणे बाबत, महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट- अ संघटना शाखा हिंगोली यांचे तर्फे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन देण्यात आले .तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व जिल्हा पोलिस अधीक्षक हिंगोली यांना निवेदन देण्यात आले.यावेळी डॉ.राजेश्वर कत्रुवार, अध्यक्ष मॅग्मो, डॉ दत्ता डूडूळे, डॉ. विनोद अतकुरकर, डॉ. सतीश रुणवाल, डॉ. पांडुरंग फोपसे, डॉ.गणेश जोगदंड, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. स्नेहल पवार, डॉ. शीतल मालू, डॉ. अक्षय बेंगाल, डॉ.गणेश ताडेवाड, डॉ.केदार रोडगे, डॉ ज्ञानप्रसाद जाधव, डॉ. व्यंकटेश जिंतूरकर, डॉ.नितीन पायघन, डॉ.अनिल मुकाडे, डॉ. शिवाजी जगताप, आदींची उपस्थिती होती.

### उजनीत रोहित पक्ष्यांचे आगमन यंदा लांबणीवर, हवामान बदलाचा परिणाम

**इंदापूर/प्रतिनिधी** : उजनी धरणाच्या पाणथळ किनाऱ्यांवर दरवर्षी हिवाळ्याच्या प्रारंभी शेकडो किलोम ीटरचा प्रवास करून येणारे रोहित पक्षी ( फ्लेमिंगो) यंदा अद्याप दिसलेले नाहीत. उजनी जलाशयावर ऑक्टोबरअखेरपर्यंत या स्थलांतरित पाहुण्यांचे थवे उतरतात; पण यंदा उजनीकाठ शांत आहे. पाणथळ किनाऱ्यांवर त्यांच्या गुलाबी छटा अद्याप उमटलेल्या नसून यावर्षी त्यांचे आगमन लांबणीवर पडले आहे.यावर्षी उजनी धरण काटोकाठ भरले आहे. रोहित पक्ष्यांना प्रिय असलेले उथळ पाण्याचा किनारी भाग अन्नासाठी, सूक्ष्म जलचर आणि शैवालांसाठी अत्यावश्यक असतो. तो भाग पाण्याखाली आहे. रोहितांना उथळ, पाणथळ, दलदलीसारख्या ठिकाणी अन्न मिळते. मात्र, या वर्षी उजनीचा नैसर्गिक चराऊ प्रदेश पाण्याखाली गेल्याने या पक्ष्यांचे आगमन लांबणीवर पडले आहे.

# क्षणभरात विझला डोणगावच्या उजेड शिवमचा अपघातात मृत्यू

## जनावरे आडवे आल्याने दुचाकी घसरली; एका क्षणात संपले तरुणाचे स्वप्नवत आयुष्य मामाच्या डोळ्यांसमोर उजाडले जीवनाचे आकाश

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील डोणगाव मेहकर रोडवरील खंडाळा गावाजवळ रविवारी (दि. २८ ऑक्टोबर) सकाळी साडेअकराच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात डोणगावचा लाडका आणि सर्वांचा आवडता तरुण शिवम यादवराव जाधव (रा. वसारी, जि. वाशीम) याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा साथीदार गंभीर जखमी झाला असून उपचार सुरू आहेत. रस्त्यावर अचानक आडवी आलेली जनावरे हा या दुर्दैवी अपघाताचा कारणीभूत घटक ठरला.

एमएच २८ एडब्ल्यु २७४५ या क्रमांकाच्या दुचाकीवरून शिवम आपल्या मित्रासह डोणगावकडून मेहकरच्या दिशेने जात होता. सत्यजित कॉलेजसमोर अचानक रस्त्यावर जनावरे आल्याने दुचाकीवरील नियंत्रण सुटले. दोघेही रस्त्यावर जोरदार पडले आणि काही फूट ओढत गेले. अपघात इतका भीषण होता की शिवमचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

शिवम हा लहानपणापासूनच डोणगाव येथे आपल्या मामाच्या, गोपाल सुभाषराव आखाडे यांच्या घरी राहत होता. मामासाठी तो केवळ भाचा नव्हता, तर मुलगा, मित्र आणि आयुष्याचा आधार होता. त्याचं बालपण, शिक्षण, आणि तारुण्य सगळं काही डोणगावच्या मातीशी जोडलेलं होतं. गावातील प्रत्येकाला तो ओळखीचा, हसतमुख आणि मदतीला तत्पर म्हणून माहीत होता.

गोपाल आखाडे हे डोळ्यांत पाणी आणत सांगतात, ''माझा शिवम म्हणजे माझं सर्वस्व होतं. माझ्या माघारी घराची संपूर्ण जबाबदारी तो घेत असे. माझा शिवम माझ्या शब्दाच्या पुढे नव्हता... माझ्या



आयुष्याचा आधारच आज निघून गेला.''

शिवमच्या अकाली जाण्याने डोणगाव गावावर शोककळा पसरली आहे. मामाच्या घरासमोर, जिथे एकेकाळी शिवमचे हसरे बोल आणि धावपळ ऐकू यायची, तिथे आज सन्नाटा पसरला आहे. घरातील प्रत्येक कोपऱ्यात त्याच्या आठवणी जिवंत आहेत. लहानपणी मामाच्या अंगाखांद्यावर खेळणारा, मोठा होऊन घराचा आधार बनलेला हा तरुण एका क्षणात काळाच्या पडद्याआड गेला.

गावातील सर्वच वयोगटातील लोक गहिवरले आहेत. मित्रमंडळींच्या डोळ्यांत अश्रू तर वृद्धांच्या ओठांवर एकच शब्द ''शिवमसारखं सोन्यासारखं मन असलेलं मूल देवाने खूप लवकर घेतलं...''

या अपघाताने फक्त एक जीव गेला नाही, तर एका मामाचा मुलगा, एका गावाचा लाडका आणि अनेकांच्या हृदयातला उजेड कायमचा विझला आहे.


## रायगड जिल्ह्यातील ३१५ नवीन अंगणवाडी केंद्रांना मंजुरी : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी स्मार्ट अंगणवाडी किट खरेदीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ३१५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त 'स्मार्ट अंगणवाड्यां'मध्ये करण्यात येणार आहे.

या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, स्मार्ट अंगणवाडी योजनेमुळे राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाचा टप्पा ठरेल.



रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, श्रीवर्धन, रोहा, म्हसळा, महाड, अलिबाग, पोलादपूर, कर्जत, खालापूर, सुधागड आणि पनवेल या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील.

या प्रकल्पामुळे अंगणवाडी सेविकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण पद्धती व पोषण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच, बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल. नवीन अंगणवाड्या बालकांचे पोषण, आरोग्य तपासणी व पूर्व-शिक्षण अधिक परिणामकारकपणे पार पाडतील. तसेच गर्भवती व स्तनदा महिलांना आरोग्य सेवा आणि पोषण मार्गदर्शन सुलभपणे उपलब्ध होईल.

महिला व बालविकास विभाग राज्यातील अंगणवाड्या सुसज्ज, आकर्षक आणि कार्यक्षम बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून 'स्मार्ट अंगणवाडी योजना' ही बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने उचललेले अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय गुजरात दौऱ्यावर

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र म ोदी ३०-३१ ऑक्टोबर रोजी गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. पंतप्रधान, ३० ऑक्टोबर रोजी, केवडिया येथील एकता नगर येथे जाणार असून सायंकाळी ५:१५ च्या सुमाराला ते ई-बसना हिरवा झेंडा दाखवतील. त्यानंतर ते एकता नगर येथे सायंकाळी ६:३० च्या सुमाराला १,१४० कोटी रुपयांहून अधिक किम तीच्या विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत.

पंतप्रधान ३१ ऑक्टोबर रोजी, सकाळी ८ च्या सुम ारास, स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पुष्पांजली अर्पण करतील. त्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रम साजरा केला जाईल. त्यानंतर, सकाळी १०:४५ च्या सुमारास, ते आरंभ ७.० मधील १०० व्या सामायिक फाउंडेशन कोर्सच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी संवाद साधतील.

पंतप्रधान एकता नगरमध्ये विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. या प्रकल्पांचे उद्दिष्ट पर्यटकांचा अनुभव समृद्ध करणे, सुगम्यतेत वाढ करणे आणि परिसरातील शाश्वत उपक्रमांना पाठबळ पुरवणे, हे आहे. एकूण १,१४० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह, हे प्रकल्प जगातील सर्वात उंच पुतळ्याभोवतीच्या क्षेत्रात निसर्ग-पर्यटन, पर्यावरणपूरक गम नशीलता, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि आदिवासी विकासाला चालना देण्याचा सरकारचा दृष्टिकोन प्रतिबिंबित करतात.

उद्घाटन होणाऱ्या प्रकल्पांम ध्ये राजपीपला येथील बिरसा मुंडा आदिवासी विद्यापीठ, गरुडेश्वर येथील अतिथ्यशीलता जिल्हा (टप्पा -१), वामन वृक्ष वाटिका, सातपुडा संरक्षक भिंत, ई-बस चार्जिंग डेपो आणि २५ इलेक्ट्रिक बस, नर्मदा घाट विस्तार, कौशल्य पथ, एकता द्वार ते श्रेष्ठ भारत भवन (टप्पा-२)पादचारी मार्ग, स्मार्ट बस थांबे (टप्पा -२), धरण प्रतिकृती कारंजे, जीएसईसी निवासस्थान, इत्यादींचा समावेश आहे. त्यानंतर, पंतप्रधानांच्या हस्ते भारतातील रॉयल किंगडम्सचे वस्तुसंग्रहालय; वीर बालक उद्यान; क्रीडा संकुल; वर्षावन प्रकल्प; शूलपाणेश्वर घाटाजवळील जेटीचा विकास; स्टॅच्यू ऑफ युनिटीजवळील प्रवासी सुविधा यांसह विविध प्रकल्पांचा कोनशिला समारंभ होईल. या कार्यक्रमात पंतप्रधान सरदार पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त दीडशे रुपयांचे विशेष नाणे तसेच स्मृती टपाल तिकिटाचे अनावरण करतील.

या दिवशी पंतप्रधान मोदी राष्ट्रीय एकता दिवसाच्या सोहोळ्यात सहभागी होतील आणि सरदार वल्लभभाई पटेल यांना पुष्पांजली वाहतील. ते उपस्थितांना एकता दिवस शपथ देतील आणि एकता दिवस संचलनाला उपस्थित राहतील.

या संचालनात विविध राज्य पोलीस दलांसह सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), भारत-तिबेट सीमा पोलीस(आयटीबीपी) तसेच सशस्त्र सीमा दल (एसएसबी) यांची पथके सहभागी होतील. या वर्षीच्या संचलनात, रामपूर हाऊंड्स आणि मुधोळ हाऊंड्स या संपूर्णपणे भारतीय जातीच्या श्वानांचा समावेश असलेले सीमा सुरक्षा दलाचे पथक, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटारसायकलींसह केलेले धाडसी सादरीकरण ही महत्त्वाची आकर्षणे असणार आहेत.

### श्रेयस अय्यर आयसीयूतून बाहेर, सिडनीत मित्र पोहोचले, कुटुंबीयांकडून तात्काळ व्हिसासाठी अर्ज

नवी दिल्ली : भारताच्या वनडे संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर याला सिडनीच्या हॉस्पिटलच्या आयसीयूमधून बाहेर काढण्यात आलं आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या वनडेत कॅच घेताना श्रेयस अय्यर जखमी झाला होता. बीसीसीआयनं श्रेयस अय्यरची प्रकृती स्थिर असून सुधारत असल्याची माहिती दिली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सिडनी क्रिकेट ग्राऊंडवर तिसरी वनडे २५ ऑक्टोबर रोजी पार पडली होती. ॲलेक्स कॅरीचा कॅच घेताना श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त झाला होता. ॲलेक्स कॅरी दुखापतग्रस्त झाल्यानंतर त्याला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. क्रिकबझनं सूत्रांच्या माहितीनुसार श्रेयस अय्यर धोक्याबाहेर असून रुग्णालयात आणखी काही दिवसांसाठी देखरेखीसाठी दाखल असेल अशी माहिती देण्यात आली आहे. डॉक्टरांकडून श्रेयस अय्यरच्या बरगडीच्या दुखापतीमुळं होणाऱ्या अंतर्गत रक्तश्रावामुळं देखरेख ठेवली जात आहे. श्रेयस अय्यरच्या कुटुंबीयांकडून तातडीच्या व्हिसासाठी अर्ज करण्यात आला आहे. त्या संदर्भातील परवानगी मिळाल्यानंतर कुटुंबीय ऑस्ट्रेलियाला रवाना होतील, अशी माहिती आहे.

## सलमानची फेवरेट सिंगर, स्मृती मानधनासोबत कसे आहे नाते?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार ओपनिंग बॅट्समन स्मृती मानधना आणि संगीतकार-दिग्दर्शक पलाश मुच्छल लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. २०१९ पासून डेटिंग करत असलेल्या या जोडीने जुलै २०२४ मध्ये आपल्या नात्याला इंस्टाग्रामवर ऑफिशियल केले होते. आता खुद्द पलाश आणि त्याची बहीण, गायिका पलक मुच्छल यांनी त्यांच्या लग्नाचे संकेत दिले आहेत. शुभंकर मिश्रासोबतच्या पॉडकास्टमध्ये पलकने स्मृतीसोबतच्या नात्यावर खुलासा केला आहे.

पलक मुच्छलने पत्रकार शुभंकर मि श्रा यांच्याशी बोलताना स्मृती मानधना सोबतचे तिचे नाते किती घट्ट आहे हे सांगितले. पलक म्हणाली, माझ्या आयुष्यातील काही खास नात्यांपैकी स्मृती मानधना सोबतचे नाते मी जपते. ती एक खूप चांगली व्यक्ती आहे. आम्ही दोघी खूर क्लोज आहे. सिस्टर सारखं नातं आमचं आहे, पण एक व्यक्ती म्हणून, वुमन म्हणून आणि आर्टिस्ट म्हणून मला तिचा खूप अभिम ान वाटतो. तिने कमी वेळेत खूप काही मिळवलं आहे, असं म्हणत पलकने स्मृतीचं कौतूक देखील केलं. स्मृती तिच्या क्रिकेट क्षेत्रात खूपच उत्कृष्ट आहे, कुटुंबवत्सल आहे आणि मूल्यांना जपणारी आहे. ती माझी बेस्ट फ्रेंड आहे, असं पलक म्हणाली. स्मृतीला संगीताची आवड आहे का, असा प्रश्न विचारला असता, पलकने ''हो, नेहमीच. तिला संगीत खूप आवडते,'' असं म्हटलं. तिचे आवडते गाणं 'कौन तुझे' आहे, असंही पलकने सांगितलं.

# आदिवासी भागात आरोग्याचे नवे मॉडेल

## मुख्यमंत्र्यांच्या पथदर्शी प्रकल्पामुळे आदिवासीनुरूप आरोग्य सेवा थेट जंगलात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गडचिरोलीच्या दुर्गम आदिवासी भागात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आरोग्यसेवेचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वयंसेवी संस्था 'सर्च' (सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च) यांच्या सहकार्याने गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी व्यापक मोहीम राबवून आदिवासी भागात आरोग्याचे एक नवे मॉडेल तयार केले आहे. येथील दुर्गम भागात आता थेट मोबाईल मेडिकल युनिट पाठवले जाऊ लागले आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही राज्याच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक नाविन्यपूर्ण योजना राबवल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून गडचिरोलीत आरोग्यसेवा थेट जनतेच्या दारात पोहोचत आहे.

**मोबाईल हॉस्पिटल थेट जंगलात**

ज्या दुर्गम भागांत पारंपरिक आरोग्यसेवा पोहोचू शकली नव्हती, तिथे आता शासनाचे 'मोबाईल मेडिकल युनिट' धाव घेत आहे. एके काळचा धानोरा तालुका हा देशातील अतीमागास, नक्षलग्रस्त आणि आरोग्यसेवेपासून वंचित



असा भाग मानला जातो. याच धानोरा तालुक्यातील ७० गावांतील आदिवासी नागरिकांना त्यांच्या दारातच डॉक्टरांकडून तपासणी, औषधे आणि उपचार मिळत आहेत. मोफत आरोग्यसेवेच्या या उपक्रमामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि विश्वासाचे हास्य उमटले आहे. यातून आरोग्य विभाग आणि आशा सेविकांच्या सहकार्याने आदिवासी भागासाठी एक नवे आरोग्य मॉडेल तयार झाले असल्याचे दिसून येते.

**'आशा' सेविकांना नवसंजीवनी**

'सर्च' संस्थेच्या आशा सेविकांना आता नव्या जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळत आहे. धानोरा तालुक्यातील १८१ आशा सेविकांना वर्षातून तीन वेळा सर्चच्या तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते.

**अधिकारी ते आशा सर्वांसाठी संयुक्त प्रशिक्षण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकताच एक अभिनव करार करण्यात आला असून, सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचारी सर्च संस्थेत प्रत्यक्ष दोन दिवस प्रशिक्षण घेणार आहेत. उच्चपदस्थ अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि आशा सेविका या सर्वांना एकत्र बसवून प्रशिक्षण देण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच क्रांतिकारी पद्धत ठरली आहे. याद्वारे खेड्यांमध्ये आरोग्याच्या त्रिस्तरीय सेवा राबविण्याचे हे पथदर्शी उदाहरण आहे.

भविष्यात या भागात आदिवासी संस्कृतीनुरूप आरोग्यसेवा विकसित करण्यावरही भर देण्यात येणार आहे.गडचिरोलीत सुरू झालेली ही आरोग्य चळवळ म्हणजे खऱ्या अर्थाने आरोग्य क्रांतीची नवी पहाट आहे.